# स्थानिक गुन्हे शाखा,नाशिक ग्रामीण

पोलीस अधीक्षक कार्यालय, नाशिक ग्रामीण,आडगाव, नाशिक-पिन ४२२००३
दुरध्वनी नंबर ०२५३-२३०९७१० E.Mail- pilcbnskr@gmail.com


---

**प्रेसनोट** दिनांक :- ०२/१०/२०१८

## येवला तालुक्यात गावठी पिस्टल व जिवंत काडतुसे बाळगणारा इसम जेरबंद स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाची कारवाई

---

जिल्हयातील कायदा व सुव्यवस्था परिस्थितीवर नियंत्रण, तसेच सराईत गुन्हेगारीस आळा बसावा यासाठी नाशिक ग्रामीण जिल्हयाचे **पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सा़े.** यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाची धडक कारवाई सुरू आहे. आज रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे **पोलीस निरीक्षक श्री. अशोक करपे** यांचे पथकाने येवला तालुक्यातील अंदरसुल शिवारात सापळा रचुन एका इसमाकडुन एक देशी बनावटीचे पिस्टल व ०५ जिवंत काडतुसे हस्तगत करून कारवाई केली आहे.

आज दिनांक ०२ ऑक्टोबर २०१८ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथकातील अधिकारी व कर्मचारी असे येवला तालुका परिसरात मालाविरूध्दचे गुन्हयातील सराईत गुन्हेगारांचा शोध घेत असतांना खब-यामार्फत गुप्त बातमी मिळाली की, येवला परिसरात बाहेरील जिल्हयातील काही गुन्हेगार हे अवैधरित्या अग्निशस्त्र विक्री करण्यासाठी येणार असल्याचे खात्रीशीर रित्या समजले. त्यानुसार स्थागुशाचे पथकाने येवला तालुक्यातील अंदरसुल शिवारात सापळा रचुन संशयीत **इसम नामे भाउसाहेब छबु मोरे, वय २५, रा. करंजी बु॥, ता.कोपरगाव, जि. अहमदनगर** यास पाठलाग करून ताब्यात घेतले. ताब्यात घेतलेले इसमाची जागेवर अंगझडती घेतली असता त्याचे कब्जात **एक देशी बनावटीचे गावठी पिस्टल व ०९ एम.एम. चे ०५ जिवंत काडतुसे** मिळुन आली. सदर इसमाकडे चौकशी करता त्याचेकडे कोणताही शस्त्र परवाना नसल्याने त्याचेविरूध्द येवला तालुका पोलीस ठाणेस ॥ गुन्हा रजि. नं. ४८/२०१८ **भारतीय हत्यार कायदा कलम ३/२५** सह मुंबई पोलीस कायदा कलम ३७(१)(३) चे उल्लंघन १३५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

नाशिक ग्रामीण जिल्हयाचे **पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सा़े,** व अपर पोलीस अधीक्षक मालेगाव **श्री. नीलोत्पल सा़े** यांचे मार्गदर्शन व सुचनांप्रमाणे स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक **श्री. अशोक करपे**, पोलीस उपनिरीक्षक **श्री. स्वप्निल नाईक**, सपोउनि रविंद्र शिलावट, पोहवा दिपक आहिरे, पोना रावसाहेब कांबळे, भरत कांदळकर, अमोल घुगे, पोकॉ प्रविण काकड, भाउसाहेब टिळे, इम्रान पटेल, लहु भावनाथ यांचे पथकाने अवैधरित्या अग्निशस्त्र बाळगणारे इसमास ताब्यात घेवुन सदर कारवाई केली आहे.